वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २.२.२०२४ नुसार जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील पात्र अधिकारी यांचे प्रस्ताव सादर करण्याबाबत.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०
16 FEB 2024
प्राप्त झाले सही..........

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०२४/प्र.क्र. १८/कोषा-प्रशा-१

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक: १६ फेब्रूवारी, २०२४

संदर्भ: वित्त विभाग, शा.नि.क्र संकिर्ण-२०२३/प्र.क्र. ४६/सेवा-४ दि.२.०२.२०२४

## परिपत्रक

वित्त विभागाच्या संदर्भाधिन दिनांक २.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देण्यात आला आहे.

संदर्भाधिन शासन निर्णयात संबंधित राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा सदर पर्याय हा सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक राहील. जे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) लागू राहील. राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे.

प्रशा - रा
व प्रशा - अ ३१
सं. त्वरीत circulate करावे.
१६|२|२४

236|2024|313:2
२०।२८० रा१ |३८२४

सदर शासन निर्णयानुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिका-यांचे जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबतचे अर्ज थेट शासनास प्राप्त होत आहेत.

यानुषंगाने अशा सूचना देण्यात येत आहेत की, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील जे अधिकारी वित्त विभाग, शासन निर्णय दि. २.०२.२०२४ मधील तरतूदीनुसार जुनी पेन्शन योजना लागू होण्यास पात्र असतील व जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू होण्याचा पर्याय निवडतील अशा अधिका-यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे सादर करावे.

संचालक, लेखा व कोषागारे यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे अर्ज शासन निर्णय दि. २.०२.२०२४ मधील तरतूदीनुसार तपासून पात्र अधिका-यांचा प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह व अभिप्रायासह शासनास सादर करण्याची त्वरीत कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसर व नावाने,

(ता.र.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संबंधित अधिकारी (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई) यांच्यामार्फत
३) निवड नस्ती (कोषा-प्रशा-१)